# राशिभविष्य - जानेवारी, २०२४.

○ दादा दामले (dadadamle@gmail.com)

===========================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षरांसाठी असलेला तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्रासाठी असलेल्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही मनापासून श्रद्धेने तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.**

=====================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत गुरु व हर्षल असे दोन ग्रह असून येथील गुरु तारक असून तो जातकाला आनंदी, आशावादी करतो. असेच तो सामाजिक कार्याची आवड असणारांना अनुकुल होईल. याच. स्थानी असलेल्या हर्षलमुळे स्वभाव चंचल, अस्थिर, विक्षिप्त, लहरी अहंकारी असा घडण्याची शक्यता दिसते.पण तो गुरुसह असल्यामुळे शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी कन्या राशीत केतू असून तो ज्यांचा अन्य जातिधर्मियांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना अनुकुल व लाभदायक होईल. इतरांना आरोग्यदायक, उदार असा होईल. या राशीच्या अष्टम स्थानी वृश्चिक राशीत शुक्र असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी जात आहे. अशा परिस्थितीत महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या काही मंडळींना अर्थलाभ होणे संभवते. ग्रहमान अनुकुल असेल तर काही मंडळींना अचानक धनलाभ होणेही संभवते. तसेच त्याच्यामुळे काही मंडळींना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यताही जाणवते. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर कलेच्या व साहित्याच्या अभ्यासाची आवड असणारांना अनुकुल होईल. या राशीच्या भाग्यस्थानी प्रथमपासून रवि, मंगळ, बुध हे तीन ग्रह आहेतच. पैकी रवि दिनांक १४ पासून या राशीच्या दशम स्थानी मकर राशीत जात आहे. अशा परिस्थितीत या राशीच्या मंडळींचा स्वभाव मानी होणे संभवते. तसेच आचरण आदर्श असे असेल. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर राजयोगकारक होईल व काही मंडळींना नोकरीत बढती, मानाचे स्थान, अधिकारपद प्राप्त होणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या मंगळामुळे काहींच्या हातून पराक्रम घडेल, स्वकर्तृत्व सिद्ध होईल. खेळ व यंत्रतंत्र कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल होईल, या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या बुधामुळे या राशीच्या लेखकांना प्रसिद्धी मिळण्याची शक्यता दिसते. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत शनि असून तो वकिलीसाराखे चिकित्सक विचार करावा लागत असणारे कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक होईल. पण कष्टानेच अर्थलाभ होणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी मीन राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून राहूमुळे शत्रूपासून रक्षण होईल; पण आप्तेष्टांत वाद, भांडणे

होणे संभवते. तसेच येथील नेपच्यून मुळे मानसिक चिंता, काळजी अशामुळे नैराश्य येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा” चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी “ओम अश्विनीकुमाराभ्याम नम:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी “ओम यमाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -**या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील राहूमुळे ज्यांचे बौद्धिक कार्यक्षेत्र आहे त्यांपैकी काही मंडळींना नोकरीत अधिकार पद, मान असे काही मिळू शकेल. पण ज्यांचे हाती अधिकार पद आहे त्यांपैकी काहींना वाममार्ग धन मिळविण्याचा मोह अस्वस्थ करील. जपा. तसेच येथील राहूमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. राहूसह असलेल्या नेपच्यूनमुळे फसवे, कुमार्गी मित्र भेटणे, आर्थिक नुकसान होणे, आर्थिक लाभास विलंब होणे संभवते.या राशीच्या व्यय स्थानी मेष राशीत गुरु व हर्षल असे दोन ग्रहअसून येथील हर्षलमुळे सांपत्तिक अडचणी, अपघात, वाईट प्रसंग अशापैकी घटना घडणे संभवते. जपा. पण गुरु-राहू योगामुळे विरक्ती येणेही शक्य दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत शुक्र असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या अष्टम स्थानी धनु राशीत जात आहे. त्यावेळी धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी धनु राशीत प्रथमपासून रवि,मंगळ व बुध असे तीन ग्रह आहेतच. पैकी येथील रवि दिनांक १४ पासून या राशीच्या भाग्यस्थानी मकर राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याचा पूर्वार्धात तो प्रतिकुलच होईल, हाती घेतलेल्या कार्यात अपयश देईल, इच्छा अपूर्ण राहतील. तसेच तो अनारोग्यकारक होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे स्वभाव मानी, अहंकारी होणे संभवते. आदर्श आचरण घडेल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या बुध व मंगळामुळे अनारोग्य, अपघात भय असणे संभवते. तसेच वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे शक्य दिसते. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे स्वभाव हटवादी, अहंकारी होणे संभवते. हुकूमशाही वृत्ती प्रबळ होईल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीशिव शंकराची व श्री हनुमानाचे उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी “ओम ब्रह्माय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोम सोमाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या चतुर्थ स्थानी कन्या राशीत केतू असून तो गृहसौख्य व कौटुंबिक सुखाचे दृष्टीने प्रतिकुलच होईल. तसेच काही मंडळींच्या मातृसुखातही बाधा निर्माण होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी वृश्चिक राशीत शुक्र असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी धनु राशीत जात आहे. अशा परिस्थितीत महिन्याच्या पूर्वार्धात तो ज्यांच्या अंगी कलागुण आहेत त्यांना ते प्रकट करण्यास संधीच मिळणार नाही. पण महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुख मिळणार असले तरी सोबत मंगळ असल्यामुळे स्वभावात हुकुमशाही वृत्ती प्रबळ होईल व त्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येऊ शकेल. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी प्रथमपासून मंगळासह रवि, बुधही आहेतच. येथील बुधही प्रतिकुलच होईल. रवि केंद्रस्थानी असेपर्यंत अनुकुल होईल; पण दिनांक १४ पासून तो या राशीच्या अष्टम स्थानी मकर राशीत गेल्यावर प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे इच्छाआकांक्षा अपूर्ण राहतील व हाती घेतलेल्या कामात अपयश येऊ शकेल. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत शनि असून बुद्धी प्रगल्भ व न्यायी होईल. त्यामुळे तो कायदा, तत्वज्ञान अशा चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्रांत कार्यरत असणारांना अनुकुल होईल; पण विचार कर्मठ होतील. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत राहू व नेपच्यून असून नेपच्यूनमुळे जातक आळशी,साहसहीन व अस्थिर मनोवृत्तीचा होणे संभवते. राहूमुळे वृत्ती अहंकारी, हटवादी होईल व स्वभाव अधिकारशाही जोपासणारा घडेल. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत गुरु व हर्षल असे दोन ग्रह असून येथील हर्षलमुळे मित्रांशी वाद, भांडणे होणे संभवते. तसेच आर्थिक लाभातही अनिश्चितता दिसून येईल. पण सोबत गुरु असल्यामुळे मोठ्या लोकांशी ओळख होईल व त्यापासून लाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर शिव शंकराची व दुर्गा देवीची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे व “दुर्गा देवी स्तोत्रा” चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी “ओम नमः:शंकराय “ तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्म -नक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -**या राशीच्या तृतीय स्थानी कन्या राशीत केतू असून त्याच्यामुळे काही दु:ख सहन करावे लागण्याची शक्यता जाणवते. तसेच काही मंडळींच्या मनात विकृत विचार प्रबळ होणे संभवते. पण स्वकर्तृत्व असेल त्यांच्यापैकी काही मंडळींचा मानसन्मान होणेही शक्य दिसते. या राशीच्या पंचम स्थानी वृश्चिक राशीत शुक्र असून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी धनु राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात अंगी असलेल्या कलाक्षेत्रात प्रगती करण्यास अनुकुल होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात अंगी कलागुण असूनही ते प्रकट करण्यास

संधीच मिळणार नाही. या राशीच्या षष्ठ स्थानी प्रथमपासून रवि, मंगळ व बुध आहेतच. पैकी येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो तो संपूर्ण महिन्याच्या काळात ओकारी-व्यवसायात अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण महिन्याच्या पूर्वार्धात अनारोग्यकारक होणेही संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी धनु राशीत असलेला मंगळ नोकरी-व्यवसायातीळ प्रगतीस पूरक होईल; पण त्याच्यामुळे उष्णता विकाराचा आजार होण्याची दुखापत होण्याची शक्यता दिसते. या स्थानी असलेल्या बुधामुळे क्वचित कोणास डोकेदुखीचा त्रास होणे संभवते. पण तो बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ या स्वराशीत शनी असून त्याच्यामुळे दु:ख, दैन्य सहन करावे लागेल. पण तो दीर्घायुष्य देऊ शकेल. या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील नेपच्यून अध्यात्माची मनापासून आवड असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती होण्यास अनुकुल होईल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील. तर काही मंडळीला परदेशगमनाची संधी मिळेल. भाग्यस्थानी असलेल्या राहूमुळेअंगी सभाधीटपणा येईल व फिरती नोकरी असणारांना तो अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत गुरु व हर्षल असे दोन ग्रह असून येथील हर्षलमुळे सतत व्यवसायात बदल करावेसे वाटेल. स्वभाव अधिकारशाही चालवणारा अहंकारी वृत्तीचा घडेल. पण सोबत गुरु असल्यामुळे तो बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयांची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी "ओम बृहस्पतये नमः:" तारक मंत्राचा, आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी "ओम सर्पाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या धनस्थानी कन्या राशीत केतू असून तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे सतत कसली तरी चिंता मनस्थिती अस्वस्थ करील. तसेच आर्थिक चिंताही अस्वस्थ करील. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीत शुक्र असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी धनु राशीत जात आहे. अशा परिस्थितीत महिन्याच्या पूर्वार्धात त्याच्यामुळे गृहसौख्य, वाहनसुख असे सर्व प्रकारचे सुखसमाधान लाभेल. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर अंगी असलेल्या कलेत प्रगती करणे शक्य होईल. पण या राशीच्या पंचम स्थानी प्रथमपासून रवि, मंगळ व बुध हे तीन ग्रह आहेतच. पण रवि -बुध मंगळासह असल्यामुळे प्रतिकुल होतील व त्यांच्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होणे व संततिसुखात बाधा येणे संभवते. शिवाय मंगळामुळे काही मंडळीना पोटविकाराचा आजार

होणे संभवते. येथील रवि  महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी मकर राशीत गेल्यावर तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल.  या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे सर्वच गोष्टीत मंदपणा येत असल्याचा अनुभव येईल. तसेच त्याच्यामुळे विवाहेच्छूना विवाहयोग संभवत  नाही. या राशीच्या अष्टम स्थानी मीन  राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील नेपच्यून

पाण्यापासून धोकादाययक असल्यामुळे खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. येथील राहूमुळे नोकरीत ज्यांच्या हाती अधिकारपद आहे अशापैकी काहींना वाममार्ग धन मिळविण्याचा मोह अस्वस्थ करील. पण त्यांनी कटाक्षाने तो मोह टाळावाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. तसेच काही मंडळींना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागणेही संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत गुरु व हर्षल असे दोन ग्रह असून गुरुच्या साथीमुळे येथील हर्षल उच्च बौद्धिक व गूढ संशोधन कार्यास अनुकुल व यशदायक होईल. शिवाय अंतर्ज्ञान शक्ती प्राप्त होणेही संभवते. तसेच त्याच्यामुळे काही मंडळींना परदेशगमनाची  संधी मिळणेही संभवते.  श्रद्धा असेल तर श्रीभगवान विष्णूची उपासना अनुकुल  होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीविष्णुसहस्रनाम स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना  मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी “ओम पितराय नमः:”

तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी “ओम भगाय  नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “आर्यमे  नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत केतू असून तो प्रतिकुल होईल व त्याच्या-मुळे या राशीची मंडळी समाजाकडून दुर्लक्षित होण्याची शक्यता जाणवते. शिवाय त्याच्यामुळे वाहनधोका असल्यामुळे रस्त्यातून चालताना सतत सावधानतेने चालणे अगत्याचे होईल. या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिकराशीत शुक्र असून तो सर्व कला व कवित्वशक्ती असणारांना अनुकुल  होईल. तसेच त्याच्यामुळे भावंडांचे सुखही मिळू शकेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर गृहसौख्य  व समाधान देणारा असला तरी या स्थानी प्रथमपासून रवि, मंगळ व वुध हे तीन ग्रह असल्यामुळे येथील मंगळामुळे गृहसौख्यात बाधा येणे संभवते. शिवाय येथील मंगळामुळे या राशीच्या  मंडळींना शांति-विश्रांती मिळणार नाही. तसेच काही मंडळींना हृदय-  हृदयविकाराचा त्रास सहन करावा लागण्याची  शक्यता दिसते. मंगळ -बुधामुळे घरीदारी कोणाशी पटणार नाही. येथील रविसुद्धा प्रतिकूलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, अपघात भय असल्यामुळे

सतत सावधानतेने आचरण करावे लागेल व सुखसमाधान  मिळणे  अशक्य होईल. पण येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी मकर राशीत  गेल्यावर अनुकुल  होईल व

संततिसुख मिळेल.  या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे सतत वाद, भांडणे,  होणे  संभवते. असे घडले तर असह्य मनस्ताप होऊन अनारोग्य होणेही संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून  हे दोन्ही ग्रह वैवाहिक जीवनातील सुखास बाधक होण्याची दाट  शक्यता जाणवते. तसेच राहूमुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील व  मनात कपटी विचार प्रबळ होतील. क्वचित कोणास वाईट मार्गाने प्रसिद्धी मिळणेही संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मेष  राशीत गुरु  व हर्षल असे दोन ग्रह असून येथील हर्षलमुळे अपघात भय असल्यामुळे घरीदारी सर्व ठिकाणी सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. पण गुरुमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभयोग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसाहक्काने धनलाभ होऊ शकेल. श्रद्धा असेल तर शिव शंकराच व हनुमानाची  उपासना  अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी “ओम सूर्याय  नमः:” तारक मंत्राचा  व ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा** -या राशीच्या धनस्थानी वृश्चिक राशीत शुक्र असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या तृतीय स्थानी धनु राशीत जात आहे. अशा परिस्थितीत महिन्याच्या पूर्वार्धात तो धनदायक होईल, तसेच सामाजिक कार्याची  आवड असणारांना व कोणत्याही कलेची आवड असणारांना आणि ज्यांची वाणी  मधुर आहे अशा संगीताची आवड असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या तृतीय स्थानी धनु राशीत गेल्यावर त्या स्थानी प्रथमपासून असलेल्या रवि -मंगळ-बुध या ग्रहांच्या युतीत येईल व त्यामुळे भावंडसुख मिळेल. रविमुळे स्वभाव दृढ निश्चयी होईल, वृत्ती न्यायी होईल व आत्मविश्वास वाढून हातून कर्तृत्व घडेल. हा रवि महिन्याच्या  उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर राशीत जात आहे. त्यावेळी तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे गृहसौख्यात बाधा निर्माण होणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या असलेल्या मंगळामुळे हाडमोड होणे संभवते. मनस्थिती चंचल होईल व महत्त्वाकांक्षा वाढेल. बुधामुळेचौकस  बुद्धी व प्रचंड ज्ञान ग्रहणशक्ती असली तरी  मंगळासह असल्याने तो बाधक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ या स्वराशीत  शनि  असून त्याच्यामुळे अंगी चिकाटीचा गुण  वाढेल व चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना तो अनुकुल व लाभदायक होईल. पण स्वार्थी वृत्ती वाढेल. शिवाय त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन  राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील नेपच्यूनमुळे उगीचच एखादी आजार- भावना  किंवा काल्पनिक चिंता  त्रस्त

करील. काही मंडळींना फसवणूक, विश्वासघात अशापैकी कारणांनी मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. पण राहूमुळे ज्यांचा परधर्मियांशी व्यावसायिक संबंध आहे अशा मंडळींना तो लाभदायक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत गुरु व हर्षल असे दोन ग्रह असून येथील गुरु वॆवाहिक जीवनातील सुखास अनुकुल असला तरी सोबत हर्षल असल्यामुळे त्या सुखात बाधा येणे संभवते. कोर्टप्रकरने असतील तर त्यात अपयश येणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी केतू असून.त्याच्यामूळे स्वभाव लहरी, खर्चिक होईल व प्रवासाची ओढ निर्माण होईल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकूल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा.
त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी “ओम वायवे नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक** - या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत शुक्र असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी धनु राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात तो सर्व प्रकारे सुखकारकच होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात धनस्थानी गेल्यावर त्या स्थानी प्रथमपासून असलेल्या मंगळ व बुध या ग्रहांच्या युतीत येणार असल्यामुळे धनदायक होणार असला तरी सोबत असलेल्या मंगळामुळे अविचाराने खर्च होणे संभवते. त्यामुळे धनप्राप्तीसाठी धडपड करावी लागेल. वाचा स्थानी असलेल्या बुधामुळे उत्तम वक्तृत्व करता येईल. या राशीच्या धनस्थानी असलेला रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी मकर राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात अहंकारी, खर्चिक व अनारोग्यकारक होण्याची शक्यता जाणवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे आत्मविश्वास वाढेल, हातून कर्तृत्व घडेल, वृत्ती न्यायी, दृढ निश्चयी होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे जीवन कष्टदायक होईल व गृहसौख्यात बाधा निर्माण होईल. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील नेपच्यूनमुळे काही मंडळींना अंतर्ज्ञान प्राप्त होईल, काहींना दैवीशक्ती,प्राप्त होईल व वाचासिद्धीमुळे मुखातून बाहेर पडणारे बोल खरे होतील. या राशीच्या लेखक व कवींना उच्च प्रतिभा व कल्पनाशक्ती प्राप्त होईल. पण येथील राहूमुळे वैवाहिक जीवनातील व कौटुंबिक सुखात तसेच संततिसुखात बाधा निर्माण होणे संभवते. पण दलाली व्यवसाय असणारांना तो लाभदायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत गुरु व हर्षल असे दोन ग्रह असून येथील हर्षलमुळे डोकेदुखी किंवा मेंदूविकाराचा आजार होणे संभवते. सबब सतत अति खोल विचार करू नका. मेंदूला विश्रांती मिळू दे. या स्थानी

असलेला गुरु अनारोग्यकारकच होईल व त्याच्यामुळे पोटाचे अनारोग्य, अपचनाचा त्रास होणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी कन्या राशीत केतू असून त्याच्यामुळे वृत्ती परोपकारी होईल. पण फसवे मित्र भेटल्यास त्यांच्यामुळे नुकसान होणेच संभवते. पण कुलदैवताच्या उपासनेस तो अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकूल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्राचे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी "ओम मित्राय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी "ओम इंद्राय नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या व्ययस्थानी वृश्चिक राशीत शुक्र असूंन तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात विकृत प्रेमप्रकरणात अडकविण्याची शक्यता दिसते. शिवाय काही मंडळींना डोळ्याच्या अनारोग्याचा त्रास सहन लागण्याची शक्यताही जाणवते. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत गेल्यावर सर्व प्रकारे अनुकुल होणार असला तरी या स्थानी प्रथमपासून मंगळ, बुध यांच्या युतीत येत असल्याने बुध अनुकुल होईल. पण मंगळाच्या हट्टी, रागीट स्वभावाचा परिणामही शुक्रामुळे मिळणाऱ्या सुखात बाधा निर्माण करू शकेल. बुध बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होणार असला तरी तोही मंगळाच्या संपर्कात येत असल्याने त्याच्यामुळे सहज प्रगती होणे संभवत नाही. या राशीच्या प्रथम स्थानी असलेला रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी मकर राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात आरोग्यदायक होईल पण माहिन्याच्या उत्तरार्धात तो अनारोग्यकारक व अहंकारी स्वभावाचाच असेल. त्यामुळे त्याच्या खर्चिक स्वभावामुळे आर्थिक चिंता निर्माण होईल. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो स्वभावाने शांत पण चिकित्सक, खोल विचार करणाराना अनुकुल असल्याने असे कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण त्याच्यामुळे भावंडांमुले मिळणाऱ्या सुखात बाधा निर्माण होऊ शकेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीं राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह कौटुंबिक व गृहसौख्याच्या दृष्टीने प्रतिकुल होतील व त्यांच्यामुळे कौटुंबिक त्रास, गैरसमज, घोटाळे, नियोजित कार्यात सतत येणारे अपयश, गृहसौख्यात येणाऱ्या बाधा निर्माण होणे संभवते. या वराशीच्या पंचम स्थानी मेष राशीत गुरु व हर्षल असे दोन ग्रह असून येथील गुरु शैक्षणिक प्रगतीस व मर्दानी खेळास अनुकुल होईल व हर्षल उच्च बौद्धिक व गूढ संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारकी व यशदायक होईल. पण त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या

दशम स्थानी कन्या राशीत केतू असून त्याच्यामुळे नोकरी-व्यवसायात धरसोड वृत्ती निर्माण होईल. या राशीच्या मंडळींनी हाती असलेली नोकरीच मनापासून करावी, तेच सुखाचे होईल. त्याच्यामुळे काही मंडळींकडून अनैतिक आचरण होणे संभवते. काहींना मातापिता सुखास मुकावें लागेल . श्रद्धा असेल तर "श्रीगुरुदेव दत्तात्रेयां"ची उपासना अनुकूल होईल . त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम निॠतये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी "ओम उदकाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या व्ययस्थानी धनु राशीत रवि, मंगळ, बुध ते तीन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी वृश्चिक राशीत असलेला शुक्र या राशीच्या व्ययस्थानी धनु राशीत येत आहे. अशा परिस्थितीत महिन्याच्या पूर्वार्धात शुक्र आर्थिक लाभास अनुकुल होईल. नवे मित्र मिळतील, संततिसुख मिळेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या व्ययस्थानी गेल्यावर विकृत प्रेमभावना प्रबळ होईल. जपा. शिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना नेत्रपीडा त्रास करीतसे दिसते. या राशीच्या व्ययस्थानी धनु राशीत असलेला रवि महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे सतत मानभंग होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत आल्यावर उदार मनाचा होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील. या राशीच्या व्ययस्थानी धनु राशीत असलेले मंगळ व बुध एकमेकाचे शत्रुग्रह ग्रह असल्याने बुधाची विचारशक्ती विकृत होणे संभवते. तसे झाल्यास हातून लबाडी, खोटेपणाचे कृत्य होणे संभवते. जपा. येथील मंगळामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. काही मंडळींना डोळ्याचे अनारोग्य त्रस्त करील. या राशीच्या धनस्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे चिकाटीने कष्ट करूनच अर्थप्राप्ती होईल. शिवाय त्याच्यामुळे आर्थिक चिंता, दात-डोळे-घसा यांचे अनारोग्य होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील नेपच्यून काही मंडळींना जलप्रवासाची किंवा परदेशगमनाची संधी मिळेल. शिवाय तो अध्यात्म व गूढ संशोधन यांची मनापासून ओढ असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण त्याच्यामुळे काही मंडळींना मेंदु विकार किंवा निद्रानाश विकार त्रास करण्याची शक्यता दिसते. पण येथील राहू अनुकुल होईल व त्याच्यामुळे आवडत्या कलेत प्रगती होईल. चैनीत काळ व्यतीत कराल; पण त्याच्यामुळे बंधुसुखात बाधा निर्माण होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत गुरु व हर्षल असे दोन ग्रह असून येथील गुरु गृहसौख्यदायक असला तरी सोबत हर्षल असल्यामुळे स्वभाव तापट, हेकट असा होईल व त्यामुळे कोणाशी पटणार नाही, सतत वाद, भांडणे होतील व कशातच सुखसमाधान मिळणार नाही. जपा. या राशीच्या

भाग्यस्थानी कन्या राशीत केतू असून त्याच्यामुळे पापकर्म प्रवृत्ती बळावण्याची शक्यता जाणवते. हातून ढोंगी आचरण होईल. श्रद्धा असेल तर "श्रीशिवशंकरा"ची व "श्रीहनुमाना"ची उपासना अनुकूल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून, श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी "ओम विष्णवे नमः:" तारक मंत्राचा व ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ-** या राशीच्या प्रथम(लग्न)स्थानी याच स्वराशीत शनिअसून त्याच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होणे संभवते. शिवाय त्याच्यामुळे अपघात भय असल्यामुळे घरीदारी सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. या राशीच्या धनस्थानी मीन राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील राहू व्यवहारचतुर व निपुण असला तरी त्याच्यामुळे कौटुंबिक सुखात बाधा निर्माण होणे संभवते. तसेच काही मंडळींना आर्थिक समस्याही त्रस्त करू शकतील. राहूसोबत नेपच्यून असल्यामुळे आर्थिक समस्या अधिकच अस्वस्थ करतील असे वाटते. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत गुरु व हर्षल असे दोन ग्रह असून येथील गुरुमुळे वृत्ती सज्जन, परोपकारी होईल, विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करता येईल, शिवाय तो हर्षलसोबत असल्यामुळे उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अधिकच उपयुक्त होईल व आपल्या संशोधन कार्यात प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. या राशीच्या अष्टम स्थानी कन्या राशीत केतू असून तो प्रतिकूलच होईल व त्याच्यामुळे काही मंडळींच्या मनात दुष्ट प्रवृत्ती प्रबळ होतील, वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील व अनारोग्यकारक होणेही संभवते. या राशीच्या दशम स्थानी वृश्चिक राशीत शुक्र असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या लाभस्थानी जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल व सुखकारक होणार असला; तरी महिन्याच्या उत्तरार्धात तो मंगळ व बुधासोबत असल्याने संततिसुखात बाधा येणे संभवते. तसेच कोणाशी पटणार नाही व कठोर परिश्रम करूनच अर्थप्राप्ती करावी लागेल. मंगळ-बुधामुळे सतत भांडणे, वाद होतील. जपा. पण हा बुध व्यापार,व्यवसाय असणारांना लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी असलेला रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी मकर राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो राजयोगकारक होईल व त्याच्यामुळे शासकीय नोकरीत असलेल्या काही जणांना बढती, अधिकार पद, मानाचे स्थान असे काही मिळू शकेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे सतत मानभंग होणे संभवते. श्रद्धा असेल तर "श्रीशिवशंकरा"ची व "श्रीहनुमाना"ची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण

करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्‌धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी “ओम वरुणाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन** - या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील राहूमुळे व्यक्तिमत्व प्रभावी होईल, पण त्याच्यामुळे सतत अपमान सहन करावे लागण्याची शक्यता जाणवते. शिवाय राहूसोबत असलेल्या नेपच्यूनमुळे मानसिक संवेदना शीघ होतील व त्यामुळे गहिरे नैराश्य येणे संभवते. या राशीच्या धनस्थानी मेष राशीत गुरु व हर्षल असे दोन ग्रह असून गुरु अनुकुल व समाधानकारक असला तरी त्याच्या सोबत अविचारी आचरण असणारा व फटकळ बोलून समोरच्याचा पमान करणारा हर्षल असल्यामुळे मनस्तापदायक होणे संभवते. त्याच्यामुळे अकारण आर्थिक संकटे निर्माण होणेही शक्य दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी कन्या राशीत केतू असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. सतत अपमान होणेही संभवते. शिवाय ज्यांच्या हाती अधिकार पद आहे अशापैकी काही जणांच्या मनात वाममार्ग धन प्राप्त करण्याचा मोह निर्माण होणेही संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी वृश्चिक राशीत शुक्र असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या दशम स्थानी धनु राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तोमहिन्याच्या पूर्वार्धात कला व साहित्तिक मंडळींना अनुकुल व प्रगतिकारक होईल पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या दशम स्थानी धनु राशीत गेल्यावर सोबत मंगळ व बुध असल्यामुळे कलाकारांच्या कलेतील प्रगतीत अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. मंगळामुळे नोकरीत वरिष्ठांशी मतभेद होतील व पटणार नाही. या राशीच्या दशम स्थानी असलेला रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी मकर राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात राजयोगकारक होईल व शासकीय नोकरीत असणाऱ्या काहींना बढती, अधिकार पद असे काही मिळू शकेल. क्वचित कोणाचा सन्मान होणेही संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात सर्वांच्या इच्छा आकांक्षा पूर्ण होतील व अर्थलाभही होईल. या राशीच्या दशम स्थानी असलेला बुध बौद्‌धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होणार असला तरी तो शत्रू ग्रह असल्यामुळे रवि सोबत असताना लाभदायक होईल; पण महिन्याच्या उत्तरार्धात तो मंगळासोबत असेल तेव्हा तो काही प्रमाणात प्रतिकुलच होईल. या राशीच्या व्ययस्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल. श्रद्‌धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयांची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्‌धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्‌धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय

नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अहिर्बुध्न्याय नम:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी ओम पूषाय नमः तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====°°°°°0°°°°°=====